

# मागेल तेव्हा काम
# मागेल तितके काम
# मागेल त्याला + तिला काम
# जितके काम
# तितके दाम




**प्रगती अभियान**

e-mail : **pragati.abhiyan@gmail.com**
website : **www.pragatiabhiyan.org**

‘उर्जस’, प्लॉट नं. ७, रविकिरण कॉलनी, चेतनानगर, नाशिक – ४२२ ००९.

# मागेल तिला काम
# मागेल त्याला काम
# केलेल्या कामाचे दाम
# जितके काम तितके दाम



काम मागणी साठी नमुना ४ चा अर्ज भरुन मागणी करता येते.
नमुने ४ मध्ये गावाचे नाव, वाडीपाडा वस्तीचे नाव, प्रत्येक मजुराचे नाव, जॉब कार्ड क्रमांक, आधारकार्ड क्रमांक, बँकेचे खाते क्रमांक (जे आधारकार्ड शी जोडलेले आहे),
अशी माहिती देऊन किती दिवस काम हवे आहे हे लिहावे.
एका साध्या कागदावर कामाची मागणी करता येते
मागणी ग्राम सेवकाकडे देवून त्याची पोच घ्यावी
नमुना ५ वर आपल्या मागणीची पोच घ्यावी.

प्रगती अभियान

# मागेल तितके काम
# मागेल तेव्हा काम
# जितके काम तितके दाम



आपल्याला जितके दिवस काम
करण्याची इच्छा आहे तितके
दिवस काम मिळवता येते

गावात एखादे काम सुरु झाले
आणि ते लवकर संपले तर
लगेच नविन कामाची मागणी करता येते.

प्रगती अभियान

# कोणकोणती कामे गावात होऊ शकतात ?

## सार्वजनिक कामे

१) वनतळे

२) वृक्षलागवड

३) माती नालाबांध

४) गावतलाव

५) ग्रामपंचायतसाठी विहिर

६) रस्ता

७) वृक्षरोपणाचे खड्डे खोदणे

८) जंगलातील जाळरेषा

९) क्रीडांगण

१०) भुमीगत बंधारे

११) जलाशयातील गाळ काढणे

१२) कालव्यांचे नुतनीकरण

१३) पडिक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड

१४) वैरण विकास योजना

१५) रोपवाटीका

१६) रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड

१७) वृक्ष संगोपन

१८) सलग समतल चर

१९) वनबंधारे

आणि इतर.



प्रगती अभियान

# व्यक्तीगत लाभाच्या योजना

## वैयक्तिक कामे


१) सिंचन विहिर
२) रोपवाटीका
३) शोषखड्डा
४) फळबाग
५) व्हर्मी कंपोस्टिंग
६) शेततळे
७) नाडेप कंपोस्टिंग
८) शौचालय
९) वृक्ष लागवड
१०) बांधदुरुस्ती(भातखाचरं)
११) दगडींबांध
१२) घरकुल
१३) सिसिटी
१४) गोठा
१५) कुकुटपालन शेड
१६) सपाटीकरण आणि इतर



प्रगती अभियान

# हजेरी पत्रक

दर दिवशी एकदा
संगणकीय हजेरी
पत्रकावर प्रत्येक मजुराची
उपस्थिती नोंदवलेली
असणे जरुरी आहे.




प्रगती अभियान

# कामाचे दाम

आपण केलेल्या कामाचे मोजमाप केले जाते केलेल्या कामाची ठरवलेल्या दराप्रमाणे हिशोब करुन आपली मजुरी ठरवली जाते.

मजुरी रोजावर नाही, तर केलेल्या कामावर आधारीत आहे.
साध्या मातीचा दर वेगळा असतो
कडक मुरुमाचा दर वेगळा असतो
६ ते ८ मजुरांच्या समुहाने काम करावे. त्यामुळे मजुरी जास्त मिळु शकते



प्रगती अभियान

दर  वर्षी  एप्रिल महिन्यात नरेगाच्या मजुरीचा दर बदलतो सध्या मजुरीचा दर २३८/- असा आहे. मातीचा दर वेगळा असतो. कडक मुरुमाचा दर वेगळे असतो. त्यापेक्षा कडक खडकाचा दर वेगळा असतो. शिवाय आपण ज्या ठिकाणाहुन माती डोक्यावर वाहुन नेतो व जेथे टाकतो त्या ठिकाणापासुन ते  जेथे टाकतो त्याचा चलाईचा कीती उंचावर टाकतो त्या उंचाईचा दर देखिल वेगळा लावला जातो.
दर वर्षी  दरपत्रक तयार केले जाते.

प्रगती अभियान

# मजूरी वाटप

**आपण केलेल्या कामाची मजुरी दर पंधरा (१५) दिवसांनी मिळणे कायद्याने बंधनकारक आहे.**



- नरेगाच्या कामाचा पगार बँकेतच जमा होतो
- तो स्वत:च काढण्यास जावे.
- महिला व पुरुषांना समान वेतन आहे.
- आपल्या गावात बँक मित्र येत असेल तर तोही आपल्याला पगार देऊ शकतो
- नरेगाचे खाते ० बॅलन्स वर काढता येते.
- बँकेच्या नियमानुसार ६ महिन्यात पैशांची देवाण घेवाण झाली नसल्यास खाते आपोआप बंद होते. त्यामुळे २ महिन्यातन एकदा बँकेचे आर्थिक व्यवहार करुन खाते सक्रिय ठेवावे
- **आपले जवळचे पोस्ट आता आपली जवळची बँक झाली आहे**






प्रगती अभियान


# ग्रामरोजगार सेवक

- ग्रामरोजगार सेवक
  - प्रत्येक ग्रामपंचायतीत ग्रामसेवकांना सहाय्यक
  - ग्रामसभा निवड करते.
  - सेवक गावातीलच रहिवाशी असतो.
  - प्रशासन व मजुर यांच्यातील दुवा म्हणुन काम करतो
- ग्रामरोजगार सेवकाची कामे
  - जॉबकार्ड बनवणे.
  - काम मागणी अर्ज भरुन घेणे.
  - मजुरांची बँक खाती उघडुन देण्यास मदत करणे.
  - हजेरी पत्रक भरणे.
  - कामाच्या ठिकाणी सुविधा पुरविणे.
  - रोजगार दिवस भरविणे.
  - मजुरांची नोंद ठेवणे इ-मस्टर नोंदणी करणे.
  - नरेगाच्या गावातील कामाच्या नियोजनात मदत करणे.
  - ग्रामरोजागरसेवक हा गावतलाच सदस्य असतो. त्याची निवड करणे व पदमुक्त करणे हे दोन्ही अधिकार ग्रामसभेलाच असतात.
  - शासन व मजुर याच्यातील सहहायक म्हणुन त्याची नियुक्ती असते.


प्रगती अभियान

# कामाच्या ठिकाणी सुविधा

- पाळणाघर
- औषधउपचार पेटी
- नमुना खड्डा
- दर फलक
- सावलीची सोय
- पिण्याच्या पाण्याची सोय
- करोनाच्या संदर्गात साबण अथवा सॅनिटायझर उपलब्ध ठेवणे.
- सर्व मजुरांनी आपले नाक व तोंड झाकलेले असावे.
  (मास्क अथवा स्वच्छ रुमालाचा वापर करावा)
- दोन मजुरांमध्ये किमान भरपुर अंतर असावे.








प्रगती अभियान

# ग्रामपंचायत सहभाग




1) मजुर नोंदणी
2) जॉब कार्ड तयार करणे
3) काम मागणी
4) संबंधीत रेकॉर्ड, माहिती तयार करणे, सांभाळणे
5) पंचायतीकडून कामे मागून गावासाठी राबविणे
6) ग्रामसभेतून हा विषय चर्चेसाठी घेणे
7) गावातील प्रत्येक गरजू मजुराला काम मिळवून देणे
8) हजेरी पत्रक, मोजमाप, मजुरी पत्रकाची प्रत असणे
9) मजुरी वाटपात सहभाग घेणे
10) गावाच्या कामांचा नियोजन आराखडा तयार करणे
11) १५ ऑगस्ट २६ जानेवारी २ ऑक्टोबर १ मे या ग्रामसभा नरेगाच्या कामासाठी व मजुरांना त्याच्या शेतात लाभाची कामे सुचविण्साठी अतिशय महत्वाच्या असतात.

प्रगती अभियान

# रोजगार दिवस

प्रत्येक महिन्यातुन एक वेळा प्रत्येक
ग्रामपंचायत मध्ये रोजगार दिवस
रोजगार दिवस आयोजीत
करण्याची जबाबदारी
ग्रामरोजगार सेवकाची
या दिवशी मजुरांच्या
संबंधीत सर्व तक्रारी व
अडचणी सोडविण्याचा प्रयत्न
रोजगार दिवस गावातील
लोकांच्या सोयीचा दिवस असतो.




प्रगती अभियान


# सामाजिक अंकेक्षण

सामाजिक अंकेक्षणामुळे आपल्या गावात झालेली कामे,
खर्च यांची तपासणी व मुल्यमापन करण्याचा अधिकार गावक–यांना मिळतो.

१) दर सहा महिन्यानी ग्रामसभेद्वारा सामाजिक अंकेक्षण होणे अपेक्षित आहे.
२) समाजिक अंकेक्षणासाठी आपल्या सारख्या गावातील प्रशिक्षित व्यक्तीची मदत घेतली जाते.
३) सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी योजनेची सर्व कागदपत्र ग्रामपंचायतमधुन उपलब्ध कुरु दिली जातात.
४) सामाजिक अंकेक्षणावेळी आलेल्या तक्रारीची नोंद घेणे. व तत्काळ निवारण अपेक्षित असते.



प्रगती अभियान


कामाचे सर्कल
दिवस १
हजेरी पत्रक सुरु (इमस्टर)
दिवस १ ते ७
काम सुरु, एक दिवस सुट्टी
दिवस ७
हजेरीपत्रक बंद व कामाचे मोजमाप
नविन मस्टर सुरु
दिवस ८ ते ९
मजुरींचे मुल्यांकन व पेऑर्डर तयार
दिवस १०
पेऑर्डरला मंजुरी, एफटीओ तयार करुन हस्तांतरीत करणे
दिवस ११ ते १४
मजुरांच्या खात्यात बँकेत पैसे जमा

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र अंतर्गत

## रोजगार मागणीचा अर्ज

**नमुना ४**

## वैयक्तिक / सामूहिक अर्ज

**(MGNREGA Operational Guidelines, Annex B2 (i)/1A)**

**(Under Section (3) (i) & para 9 of Scheudle ll of Central Act)**

| |
|---|
| गांव |
| ग्रामपंचायत |
| तालुका |
| जिल्हा |

अर्ज क्रमांकः

प्रति,
**ग्रामसेवक (गटविकास अधिकारी/तहसीलदार)**

महोदय,

मी/आम्ही दि. / / पासून दि. / / पर्यंत एकूण दिवसांसाठी ____________ रोजगाराची मागणी करत आहोत.

**जॉब कार्ड क्रमांक (गावाच्या कोड पर्यंत)**

| M | H | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (राज्य) | | (जिल्हा) | | (तालुका) | | | (ग्रापं) | | | (गांव) | | | |

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव | जॉब कार्ड वरील कुटुंब क्रमांक (शेवटचे ४ आकडे) | बँक खाते क्रमांक | कामाच्या ठिकाणी पाळणाघराची आवश्यकता आहे काय? | सही/अंगठा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

मजूराची पोच मिळाल्याची सही

दिनांकः अर्जदाराची सही

---

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र अंतर्गत

## रोजगार मागणीचा अर्ज प्राप्त झाल्याची पोच

अर्ज क्रमांक :

**नमुना ५**

(Under Section (3) (i) & para 9 of Schedule II of Central Act)

अर्जदार ____________________________________________ ( + मजूर) यांच्याकडून दि. / / पासून

दिनांक / / पर्यंत एकूण ______ दिवस रोजगार अर्ज प्राप्त झाला.

आपणांस आश्वासित करण्यात येते की, आपणांस काम मागणी केल्यापासून किंवा अर्ज सादर केल्यापासून पंधरा दिवसाचे आत अकुशल रोजगार पुरविण्यात येईल. उपरोक्त प्रमाणे रोजगार पुरविणे अशय ठरल्यास आपणास कायद्यानुसार बेरोजगार भत्ता देण्यात येईल

ठिकाणः

दिनांकः अधिकाऱ्याचे नाव, सही आणि शिक्का

नमुना - ४ (मागील बाजू)

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव | जॉब कार्ड वरील कुटुंब क्रमांक (शेवटचे ४ आकडे) | बँक खाते क्रमांक | कामाच्या ठिकाणी पाळणाघराची आवश्यकता आहे काय? | सही/अंगठा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

आम्ही याद्वारे हमी देतो की नोंदणी/कार्यक्रम अधिक ऱ्याने निर्देशित केलेल्या कामावर सतत १४ दिवस काम करू.

दिनांकः ठिकाणः

---

टीपः

१. ग्रामसेवकाने अर्ज न स्वीकारल्यास गटविकास अधिकारी/तहसिलदार यांच्याकडे मागणी करता येईल.

२. मागणी साध्या कागदावरही करता येते. याच नमुन्यात करण्याची जरूरी नाही; परंतु हीच माहिती द्यावी.

३. एखाद्या कुटुंबाचा मागणी कालावधी वेगळा असल्यास त्या कुटुंबाने वेगळा अर्ज करावा.

रोजगार हमी योजना गावातील प्रत्येकाच्या हाताला काम देते. रोजगार मिळणे हा आपला हक्क आहे.

आपल्या गावातच राहून, काम करुन मजुरी मिळवता येते. गावातील कितीही मजुरांना, कितीही दिवस काम मिळू शकते. दिवसभर भरपूर कष्ट केले तर किमान २३८ रुपये मजुरी मिळू शकते. असे अंगमेहनतीचे काम करुन आपल्याच गावासाठी तलाव, शेततळे, बांध, विहीर, सपाटीकरण, सलग समतल चर, रस्ते अशी विविध कामे करता येतात.

या योजनेमुळे आपल्या गावाचे दोन फायदे आहेत. गावातल्या गावात रोजगार आणि कामांमधून पाणी अडविण्यासाठी, जिरण्यासाठी व साठविण्यासाठीच्या साधनांची निर्मिती, यामुळे आपल्या शेतीचा आणि गावाचा विकास नक्कीच होऊ शकतो.या योजनेसाठी निधीची मर्यादा नाही.

या पुस्तिकेत या योजनेची थोडक्यात माहिती दिली आहे. याचा गावातील तरुण, ग्रामपंचायत सदस्य व सरपंच, ग्रामसेवक व सर्वच ग्रामस्थांनी गावाच्या विकासासाठी जरुर उपयोग करावा.

या बाबतीत काही अधिक माहिती हवी असल्यास **‘प्रगती अभियानशी’** संपर्क साधा. आपल्याशी संवाद करण्यास आम्ही उत्सुक आहोत.